# <u>जाहिरात</u>

राज्यातील वक्फ जमिनीवरील अतिक्रमणे दूर करण्याच्या व इतर गैरकृती, बेकायदेशीर कारवाया रद्द करुन संबंधित वक्फ मालमत्ता वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करण्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सहाय्य करण्यासाठी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली एक उपजिल्हाधिकारी, दोन तहसिलदार व दोन नायब तहसिलदार अशा अधिकाऱ्यांचा समावेश असलेल्या एका कृतीदलाची तीन वर्षाच्या कालावधीकरिता नियुक्ती करावयाची आहे.

सदर कृतीदलाचे मुख्यालय औरंगाबाद येथे असून कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र असेल. सदर कृती दलावर प्रतिनियुक्तीने काम करु इच्छिणाऱ्या उपजिल्हाधिकारी, तहसिलदार आणि नायब तहसिलदार दर्जाच्या अधिकाऱ्यांनी विहित मार्गाने **दि.३०.०३.२०१७** पूर्वी निश्चितपणे पोहचतील अशा बेताने **प्रधान सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय (विस्तार), मुंबई- ४०० ०३२** यांच्याकडे सर्व वैयक्तिक तपशीलासह (Bio-Data) अर्ज सादर करावा. तद्नंतर प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

वर नमूद केल्याप्रमाणे करण्यात आलेले कोणतेही किंवा सर्व अर्ज कोणतेही कारण न देता फेटाळण्याचे सर्व अधिकार शासनाकडे अबाधित आहेत.

**सही/-**
**प्रधान सचिव,**
**अल्पसंख्याक विकास विभाग**